बल्लारपूर वनक्षेत्रात वनपर्यटनाला सुरुवात होणार

प्रतिनिधी/चंद्रपूर-प्रादेशिक वनक्षेत्रातील बल्लारपूर वनपरिक्षेत्र अंतर्गत येणाऱ्या कारव्यात पहिल्यांदाच येत्या २६ जानेवारीपासून प्रायोगिक तत्वावर वन पर्यटनाला प्रारंभ होणार आहे. देशात पहिल्यांदाच प्रादेशिक वनक्षेत्रात, कारव्यात असे वनपर्यटन होत असल्याची माहिती मध्यचांदा वनविभागाचे उपवनसंरक्षक अ. द. मुंढे यांनी दिली आहे.

कारवा वनक्षेत्रात ३० किलोमिटरचे कच्चे रस्ते आहेत. या क्षेत्रात वाघ, बिबट, रानगवे, अस्वल, रानमांजर, हरीण, चितळ, सांबर, निलगाय, चौसिंगा, सायाळ, रानकुत्रे, मुंगूस, सायाळ, रानडुक्कर आदी प्राण्यांचा वावर आहे. जवळपास २०० प्रकारचे पक्षी व विविधरंगी फुलपाखरांचा समावेश आहे.

PUBLIC NOTICE

I am investigating the title of Mr.Mahendra H Visaria, who is claiming to be the absolute owner of an immovable property being a free hold land bearing plot no.127 of TPS VI, survey no.247(part), plot nos.9, 12 and 16, C.T.S. no.1056 and 1056 (1) to (4), situated at Vallabhbhai Road, Vile Parle (West), Mumbai 400056 admeasuring about 312.48 sq.mtrs equivalent to 372 sq. yards along with structure standing thereon comprising of ground plus three floors totally admeasuring about 533.50 sq.mtrs. carpet area.

Any person claiming any interest on the said property or any part thereof, by way of sale, exchange, mortgage, gift, trust, inheritance, bequest, possession, lease, lien, easement or otherwise, is hereby required to communicate the same to the undersigned at her office at G-31, Ground Floor, Shrinivas Building, Prathna Samaj Road, Vile Parle (East), Mumbai 400057 within 10 days from date hereof. Thereafter no claims will be entertained and title certificate will be issued accordingly.

Sd/-
Adv. Nilanjana M. Shah
Date: 24-1-2021

CHANGE OF NAME

I, Shri Pravinchandra H. Shah, son of Shri Hirji Shah, aged 67 years, residing at Flat No. 63-D, Navyug Mansion, 3rd Floor, Sleater Road, Grant Road (W.), Mumbai - 400 007 do hereby solemnly affirm and say as under :

That I hereby confirm that my prior surname 'Kenia' during school times has been changed to 'Shah' now since years and all my official and legal documents are with the surname 'Shah'. As per Affidavit dt. 21.01.2021.

Date : 24.1.2021
Sd/-
Pravinchandra H. Shah

शिवसैनिक हेच मोठे पद–सुभाष पवार

वार्ताहर/पोलादपूर

नगरपंचायतीच्या निवडणुकांसाठी शिवसेनेने सज्ज राहिले पाहिजे. नजिकच्या काळात धनुष्यबाणाचे चिन्ह हिच उमेदवारी असून शिवसैनिक हेच मोठे पद आहे जे कधीही माजी होत नाही, हे लक्षात ठेवून शिवसैनिकांनी कामाला लागावे, असे आवाहन महाड विधानसभा संपर्कप्रमुख सुभाष पवार यांनी केले.

पोलादपूर शिवसेना संपर्क कार्यालयामध्ये यावेळी महाडचे आमदार भरत गोगावले, महाड विधानसभा संपर्कप्रमुख सुभाष पवार, तसेच विविध पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी आ. गोगावले आणि सुभाष पवार यांच्याहस्ते तीन लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरूपात विविध वस्तुंचे वाटप केले.

प्रारंभी राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे यांनी, आ.गोगावले यांनी आणलेल्या ३ कोटींच्या कामांचा शुभारंभ करण्याची मागणी केली. यावेळी कळंबे यांनी शहरातील नगरसेवकांमध्ये तसेच इच्छुकांमध्ये रस्सीखेच असल्याचे मत मांडले.

भिवंडीत क्रिकेटच्या वादातून एकावर गोळीबार

वार्ताहर/भिवंडी

क्रिकेट खेळण्यासाठी गेलेल्या तरुणाचा मैदानाकडे जाणारा रस्ता अरुंद असल्याने गाडी मागे घेण्यावरून झालेल्या वादातून एकावर गोळीबार झाल्याची खळबळजनक घटना भिवंडीतील पायगाव गावात शनिवारी सायंकाळी घडली आहे. याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान हा हल्ला पूर्व वैमनस्यातून झाला आहे का त्यानुषंगाने देखील पोलीस तपास करीत आहेत .

प्रफुल तांगडी असे या गोळीबारात जखमी झालेल्या तरुणाचे नाव असून पायगाव येथे फोर्टी प्लस क्रिकेट सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. मात्र या क्रिकेट ग्राऊंडकडे जाणारा रस्ता अरुंद असल्याने जखमी व हल्लेखोर यांच्या गाड्या समोरासमोर आल्या असता गाड्या मागे घेण्यावरून दोन गटात शाब्दिक बाचाबाची झाली . '' आधी तू गाडी मागे घे , आधी तू गाडी मागे घे'' अशी जोरदार बाचाबाची झाल्यांनतर या बाचाबाचीचे रूपांतर हाणामारीत झाले व त्यानंतर एका तरूणाने चक्क प्रफुल याच्यावर रिव्हॉल्वरने फायर केल्या. या गोळीबारात प्रफुल गंभीर जखमी झाला असून त्याच्या छातीवर , पोटावर व हातावर तीन गोळ्या लागल्या असल्याने त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. त्यास ठाण्याच्या खासगी रुग्णालयात दाखल केले. तर गोळीबार करणारा हल्लाखोर तरुण फरार झाला असून भिवंडी तालुका पोलीस त्याचा कसून शोध घेत असल्याची माहिती तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राम भालसिंग यांनी दिली आहे.

अर्थसंकल्पापूर्वी अर्थखात्यातील कर्मचाऱ्यांना सीतारामन यांनी दिला हलवा

वृत्तसंस्था/नवी दिल्ली

कोरोना काळातील सर्वात पहिलं बजेट यंदा मांडलं जाणार आहे. कोरोनानंतर सर्वच क्षेत्रांवर त्याचा कसा परिणाम होईल ते येत्या काही दिवसांत समोर येईल. मात्र दरवर्षी न चुकता अर्थसंकल्पाआधी होणारा हलवा समारंभ आज दुपारी ३.३० च्या सुमारास झाला. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आपल्या हाताने हलवा तयार करून सर्व कर्मचाऱ्यांचे तोंड गोड केले.

आता त्यानंतर अर्थसंकल्प सादर होईपर्यंत या कर्मचाऱ्यांना क्वारंटाइन करण्यात येणार आहे. कोरोनाचा संसर्ग होऊ नये यासाठी या कर्मचाऱ्यांना १० दिवस क्वारंटाइन केले जाईल.

अर्थसंकल्प १ फेब्रुवारी रोजी सादर केला जाणार आहे. आज दुपारी अर्थ मंत्रालयात हलवा सोहळा आयोजित केला. ही परंपरा अनेक वर्षांपासून सुरू आहे. संसदेच्या नॉर्थ ब्लॉकमध्ये होणाऱ्या या कार्यक्रमात अर्थमंत्री निर्मला सीतारमण, अनुराग ठाकूर, अर्थ मंत्रालयाचे सचिव आणि अन्य वरिष्ठ अधिकारी सहभागी होते.

कोरोनामुळे हलवा तयार करण्याचा सोहळा होणार नाही, अशी चर्चा होती. अर्थमंत्रालयाकडून या चर्चांना पूर्णविराम दिला. अर्थमंत्री १ फेब्रुवारीला संसदेत बजेट सादर करणार आहेत. त्याआधी हलवा तयार करण्याचा सोहळा पार पडला. सर्व कर्मचाऱ्यांना १० दिवसांसाठी नॉर्थ ब्लॉकमध्ये क्वारंटाइन करण्यात येणार आहे. बजेट तयार होत नाही तोपर्यंत या कर्मचाऱ्यांना कोणालाही भेटण्याची परवानगी नसणार आहे.

मी विवेकानंद बोलतोय स्पर्धा

राज्यात सेजल डिचोलकर प्रथम

प्रतिनिधी/मुंबई

संस्कृति संवर्धन प्रतिष्ठानच्यावतीने स्वामी विवेकानंद जयंती निमित्ताने मी विवेकानंद बोलतोय या राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत मी विवेकानंद बोलतोय यावर स्वतःचा व्हिडीओ बनवून पाठवावा असे सांगितले होते.त्यात ९४७ विद्यार्थ्यांनी भाग घेतला आणि त्यातून दादरच्या सेजल डिचोलकर हिने प्रथम क्रमांक पटकावला.नेहा जोशी,कुलदीप रजक यांनी अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला.याशिवाय अक्षय कुलकर्णी, ज्ञानेश्वर कदम,रूची मोरे, मृणाल साळुंखे,दश्मी रामगुडे यांना उत्तेजनार्थ पुरस्कार देण्यात आले.

नैतिक शिक्षणाच्या प्रचार-प्रसाराचे कार्य करणार्या प्रतिष्ठानच्या या स्पर्धेच्या आयोजनात अस्मिता आपटे यांनी विशेष परिश्रम घेतले.

अर्णबवर कारवाईसाठी कायदेशीर मत मागवले – अनिल देशमुख

प्रतिनिधी/नागपूर

भारत बालाकोटवर हल्ला करणार ही माहिती अर्णब गोस्वामीला तीन दिवस आधी कशी कळाली? हा राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित प्रश्न असून अंत्यत गंभीर बाब असून सीक्रेट अँक्ट नुसार कार्यालयीन गोपनीयतेचा भंग करणारे आहे. याबाबत आम्ही अर्णब यांच्यावर काय कारवाई करता येईल, याबाबत कायदेशीर मत मागवलं आहे,' असं राज्याचे गृहमंत्री अनिल देशमुख यांनी स्पष्ट केलं आहे.

'अर्णब गोस्वामी आणि बार्कचे माजी सीईओ पार्थो दासगुप्ता यांच्या संभाषणात धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. बालाकोटच्या हल्ल्याची माहिती तीन दिवस आधी अर्णबला कशी मिळाली. एखाद्या देश दुसऱ्या देशावर हल्ला करणार असेल तर त्याची माहिती संरक्षण मंत्री आणि तीन- चार महत्त्वाच्या नेत्यांना असते. केंद्रीय नेत्यांनाही याबाबत माहिती दिली जात नाही. मग अर्णब गोस्वामीला ही माहिती कशी मिळाली. त्यावर केंद्र सरकारने उत्तर दिले पाहिजे,' अशी मागणीही अनिल देशमुख यांनी दिली आहे.

राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यांच्यावर रेणू शर्माला राजकीय दबावातून तक्रार करायला लावली होती, असा दावा अनिल देशमुख यांनी केला आहे.

पण, 'राजकारणाची पोळी भाजण्यासाठी धनंजय मुंडेंवर ज्या पद्धतीने आरोप केले ते चुकीचे होते, आता रेणू शर्मानं याबाबतही स्पष्टीकरण केलं आहे,' असंही ते म्हणाले आहेत. शिवाय, 'हा विषय आता संपला आहे,' असंही त्यांनी नमूद केलं आहे.

मिऱ्या–नागपूर हायवेच्या भूसंपादनाला सुरूवात

वार्ताहर/रत्नागिरी

कोकणला पश्चीम महाराष्ट्र व विदर्भला जोडणाऱ्या मिऱ्या नागपूर मार्गासाठी रत्नागिरी ते कोल्हापूर एकूण १३४ किलोमीटरच्या मार्गाचे राहिलेले भूसंपादन येत्या दोन महिन्यात सुरू होणार आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधीकरणाने गॅझेट प्रसिध्दीस देऊन २५ जानेवारीपर्यंत हरकती मागविल्या आहेत. सोलापूर, कोल्हापूर, रत्नागिरी असा दुसरा टप्पा निश्चीत करण्यात आला मात्र यामध्ये रत्नागिरी जिल्हयातील किरकोळ भूसंपादन राहिले आहे. कुवारबावची भूसंपादन प्रक्रिया पूर्ण झाली आहे. जिल्हयातील भूसंपादन प्रक्रिया जवळपास पूर्ण झाली आहे.

मिऱ्या नागपूर महामार्गाच्या चौपदरी करणाचे काम गेली १२ वर्षे रखडले होते. या दुसऱ्या टप्प्याच्या भूसंपादनानंतर त्याला गती मिळणार आहे. नागपूर ते रत्नागिरी असा ५४८ किलोमीटरचा राष्ट्रीय महामार्ग व्हावा अशी २००१ पासून सूरू आहे. पण मार्च २०१३ मध्ये याची अधी सूचना जारी झाली.

खऱ्या अर्थाने राज्य मार्गाचे रूपांतर चौपदरी महामहार्गात करण्यासाठी सर्वेक्षण सुरू आहे. तुळजापूर, लातूर, अहमदपूर, नांदेड, यवतमाळ, वर्धा, बुटीबोरी, एमआयडीसी, नागपूर असा पहिला टप्पा तर सोलापूर, सांगोला, कोल्हापूर, रत्नागिरी असा दुसरा टप्पा निश्चीत करण्यात आला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या पुढाकाराने २०१५ मध्ये यासाठी १५०० कोटीच्या निधीची तरतूद झाली त्याचे काम सुरू आहे.

दुसऱ्या टप्प्याचेही काम मिरजपर्यंत सुरू आहे पण चोकाक ते रत्नागिरी हे काम अजून भुसंपादनातच अडकले आहे. कंपनीकडून योग्य मोबदला दिला जात नसल्याने शाहूवाडी, पन्हाळा तालुक्यातील शेतकऱ्यानी भूसंपादनास विरोध केला आहे. आता पुन्हा राष्ट्रीय महामार्ग प्राधीकरणाने गॅझेट प्रसिध्द देऊन काही हरकती असल्यास कळवावे अन्यथा काम सूरू केले जाईल असे कळविले आहे.रत्नागिरी जिल्हयात येणाऱ्या आंबा, साखरपा, रत्नागिरी तालुक्यातील बहुतेक भूसंपादन झाले आहे. काही ठिकाणी किरकोळ भूसंपादन राहिले तर कुवारबाव बाजारपेठेत विरोध झाल्याने हे काम मागे पडले होते मात्र त्याचेही भुसंपादन निश्चीत झाले आहे. थ्रीडी झाल्याने यालाही भूसंपादनाचे जिल्हयातील काम अंतिम टप्प्यात आहे.

Bharat Bijlee

भारत बिजली लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : इलेक्ट्रिक मॅन्शन, ६ वा मजला, अप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०० ०२५.
सीआयएन : एल३१३००एमएच१९४६पीएलसी००५०१७; **फोन क्र. :** २४३०६२३७, **फॅक्स क्र. :** २४३७०६२४
वेबसाईट : www.bharatbijlee.com; **ई-मेल :** bblcorporate@bharatbijlee.com

मंडळ सभेच्या पुर्ननियोजनाकरिता सूचना

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन, २०१५ (लिस्टिंग रेग्युलेशन्स) च्या रेग्युलेशन्स २९ सहवाचता रेग्युलेशन्स ४७ ला अनुसरून सूचना याद्वारे देण्यात येते की, कंपनीच्या संचालक मंडळाची सभा जी मंगळवार, ९ फेब्रुवारी, २०२१ रोजी चुकीने नियोजित करण्यात आली होती ती कंपनीच्या संविधानिक लेखापरिक्षकांद्वारे मर्यादित पुर्नविलोकनाच्या अधीन ३१ डिसेंबर, २०२० रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महिन्यांकरिता कंपनीचा अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष इतर बाबींसह पटलावर घेण्यासाठी **ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमाद्वारे बुधवार, १० फेब्रुवारी, २०२१ रोजी घेण्याचे पुर्ननियोजित आहे.**

सदर माहिती खालील वेबसाईटवर सुध्दा उपलब्ध आहे:

१. कंपनी www.bharatbijlee.com;
२. बीएसई लिमिटेड www.bseindia.com;
३. नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया www.nseindia.com

भारत बिजली लिमिटेड करिता
दुर्गेश एन. नगरकर
कंपनी सेक्रेटरी आणि
सिनि. जनरल मॅनेजर लिगल

स्थळ : मुंबई.
दिनांक : २३ जानेवारी, २०२१

जाहीर नोटीस

वकील : श्रीमती. साधना धुरी

मा. जिल्हा न्यायाधीश - ३, व अति. सत्र न्यायाधीश वसई यांचे न्यायालयात, ता.वसई जि. पालघर

दिवाणी चौकशी अर्ज क्र. १७/२०२०
निशाणी क्रं.

दत्ता धाकु नाईक.
वय ६९ वर्ष व्यवसाय वकील
रा.एफ/२१, प्रभुकृपा नगर, नविन पेट्रोल पंपा चे बाजुला बरामपुर उमेला वसई पश्चीम ४०१ २०२
... अर्जदार

विरुद्ध
कोणीही नाही

ज्याअर्थी श्री. दत्ता धाकु नाईक, रा.एफ/२१, प्रभुकृपा नगर, नविन पेट्रोल पंपा चे बाजुला बरामपुर उमेला वसई पश्चीम ४०१ २०२ यांनी कु. यशिका भास्कर भोसले याचे पालक म्हणुन नियुक्त करण्याबाबत व तसा पालकत्वाचा दाखला मिळणेसाठी या न्यायालयात दिवाणी चौकशी अर्ज क्र. १७/२०२० दाखला केला आहे.

तरी सर्व संबंधितांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांना पालक म्हणुन नियुक्त करणे व पालकत्वाचा दाखला देणे बाबत संबंधित नातेवाईक अगर हित संबंधित त्यांची हरकत अगर तक्रार असल्यास योग्य त्या कागदपत्रासह तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाले नंतर दि. २०/०२/२०२१ पुर्वी पर्यंत या न्यायालयात दाखल करावी.

जर मुदतीत कोणाचीही हरकत वा तक्रार न आल्यास अर्जदारास त्याची विनंतीप्रमाणे पालक म्हणुन नियुक्त करणे व पालकत्वाचा दाखला देण्यात येईल व त्या नंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही याची सबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक २१/०१/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

हुकुमावरुन

सही/-
कनिष्ठ लिपिक
अप्पर जिल्हा व सत्र न्यायालय, वसई

कोर्टाचा गोल शिक्का

सही/-
अधिक्षक,
अप्पर जिल्हा व सत्र न्यायालय, वसई

जाहिर नोटिस

कर्नल संजय किशोर (निवृत्त) यांचे २६ नोव्हेंबर २०२० रोजी निधन झाले आहे. त्याचे हयातील प्लॅट क्रमांक १२०६ ए, विंग, हाईलॅंड टॉवर्स लोखंडवाला टाऊनशिप, आकुर्ली रोड, कांदीवली (पूर्व) मुंबई - ४०० १०१ या वर्णनाची मिळकत तसेच सामायिक प्रमाणपत्र क्रमांक ०९० च्या अंतर्गत ४४६ ते ४५० पर्यंत (दोन्ही समाविष्ट) प्रत्येकी ५० रू किंमतीचे ५ शेअर्स हे त्यांचे ताब्यात मालकी हक्काने होते. त्यांचे पश्चात श्रीमती. निरूपमा किशोर. ही हयात पत्नी व २ मुले हे त्यांचे कायदेशीर वारस असले कारणाने सदरचा मालकी हक्क त्यांचेकडे हस्तांतरीत होत आहे. उपरोक्त वर्णनाच्या मिळकतीवर अथवा मिळकतीचे कोणतेही भागावर कोणत्याही व्यक्तीचा कोणत्याही स्वरूपाचा दावा, हितसबंध अथवा हक्क असेल तर त्यांनी मा. सेक्रेटरी, हायलॅड टॉवर, सीएचएस लोखंडवाला टाऊनशिप कांदीवली (पूर्व) मुंबई ४०० १०१ यांचेकडे सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाचे आत लेखी स्वरूपात कळविणे गरजेचे आहे. अन्यथा मुदतीचे बाहेर कळविण्यात येणारा कोणताही हक्क, हितसंबंध व दावा सोडून दिला आहे अथवा नाही असे गृहीत धरण्यात येईल.

श्रीमती. निरूपमा किशोर
प्लॅट क्रमांक १२०६ ए, विंग, हाईलॅंड टॉवर्स,
लोखंडवाला टाऊनशिप आकुर्ली रोड, कांदीवली (पूर्व) मुंबई - ४०० १०१

जाहीर नोटीस

तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, गांव मौजे-सोनावे, ता. व जि. पालघर येथील गट क्र. २९४ हि. नं. क्षेत्र (हे.आर.) ००-२४-५०, आकार रु. पै. ०.७८ ही जमीन मिळकत १) श्री. वसंत रामु घाटाळ व इतर ४ ह्यांच्या सामाईक मालकी व कब्जेवहिवाटीची असून त्यांनी आमचे अशील १) श्री. अंकुश शांताराम जाबर, रा. मु.पो. पारगांव, सफाले पारगांव रोड, बस स्टॅण्ड जवळ, ता. पालघर, जि. पालघर - ४०१३०३. २) श्री. अनिल सुर्यकांत कोम, रा-घ नं. ५००, ता. वसई, पो. वसई, भुईगांव, वसई (पूर्व), ता. वसई, जि. पालघर ३) श्री. सुनिल मदन जाधव, रा-घ नं. ७१, हनुमान मंदिरजवळ, राजावली, वसई (पूर्व), ता. वसई, जि. पालघर ह्यांना कायमस्वरुपी विकत देण्याचे ठरविले आहे तरी सदरचे मिळकतीवर कोणाही व्यक्ति वा संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, वहिवाट, शेअर, विक्री, गहाण, लिज, परवाना, बक्षीस, कब्जा, बोजा असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत योग्य त्या लेखी कागदोपत्री पुराव्यासहित खालील पत्त्यावर कळवावे, अन्यथा आपला काहीही हक्क नाही व तो असल्यास आपण सोडला आहे असे समजून व्यवहार पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ऑफिस पत्ता : नुतन विनायक अपार्टमेंट, शॉप नं. ८, चंदनसार रोड, विरार (पूर्व), ता. वसई, जि. पालघर.

खरेदीदारांचे वकील
अॅड. मनिष प्रमोद पाटील (गावड)

RELIANCE Infrastructure

NOTICE

Notice, pursuant to Regulation 29 read with Regulation 47 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, is hereby given that a meeting of the Board of Directors of the Company is scheduled to be held on Monday, February 1, 2021, inter alia, to consider and approve the Unaudited Financial Results (both stand-alone and consolidated) for the quarter and nine months ended December 31, 2020, of the Financial Year 2020-21.

This intimation is also available on the website of the Company, BSE Limited and National Stock Exchange of India Limited at www.rinfra.com, www.bseindia.com and www.nseindia.com, respectively.

For **Reliance Infrastructure Limited**

Date : January 23, 2021
Place : Mumbai

Paresh Rathod
Company Secretary

Reliance Infrastructure Limited
CIN: L75100MH1929PLC001530
Regd. Office: Reliance Centre, Ground Floor,
19, Walchand Hirachand Marg,
Ballard Estate, Mumbai 400 001
Tel: +91 22 4303 1000; Fax: +91 22 4303 8662
E-mail : rinfra.investor@relianceada.com
Website : www.rinfra.com

पोलादपुरातील विकासकामांना सरकारकडून मोठा निधी देणार

पालकमंत्री अदिती तटकरे यांची ग्वाही

वार्ताहर/पोलादपूर

रायगड जिल्ह्यातील रत्नागिरी जिल्ह्याच्या सीमेलगतच्या दुर्गम भागातील जनतेला आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यासाठी १२ वर्षांपूर्वी तत्कालीन पालकमंत्री सुनील तटकरे यांच्याहस्ते भूमिपुजन झालेल्या आरोग्य केंद्राचे उदघाटन त्यांचाच मुलगी असताना रायगडच्या पालकमंत्री पदावरून करण्याची संधी मिळत असल्याचे भाग्य वाटत असताना दुसरीकडे या इमारतीच्या बांधकामासाठी १२ वर्षांचा कालावधी लागल्याचा खेद वाटत आहे. येत्या काही वर्षांमध्ये पोलादपूर तालुक्यातील रस्ते,आरोग्य आणि जलसंधारण कामांना महाआघाडी सरकारमार्फत विशेष भरीव निधी उपलब्ध करून देणार असल्याची ग्वाही रायगडच्या पालकमंत्री अदिती तटकरे यांनी येथे दिली.

वंचित बहुजन आघाडीचे ३७७० उमेदवार विजयी ?

प्रतिनिधी/नागपूर

नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र राज्यातील ग्रामपंचायत निवडनुकीत अँड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात वंचित बहुजन आघाडी ने घवघवीत यश संपादित केले. ग्रामीण भागातील सत्तेची चाबी असलेल्या ग्रामपंचायत मधे पक्षाचे हजारों सदस्य पोहचवून वंचित बहुजन आघाडी ने सर्वच प्रस्थापित पक्षांना घाम सोडला.

नागपुर जिल्ह्यात पक्षाचे वरिष्ठ नेते राजू लोखंडे, रवीभाऊ शेंडे व राहुल वानखेडे यांच्या मार्गदर्शनात व जिल्हा अध्यक्ष विलास वाटकर यांच्या नेतृत्वात एकुण ४१ ग्रामपंचायत सदस्य निवडून आलेत.

नागपुर ग्रामीण तालुका अंतर्गत दवलामेटी च्या प्रतिष्ठित समजल्या जानाऱ्या १७ सदस्यीय ग्रामपंचायत मधे पक्षाचे तालुका अध्यक्ष अतुल शेंडे यांच्या नेतृत्वात ७ सदस्यांनी विजय नोंदवत अनपेक्षितपणे भाजपा ला सत्तेबाहेर केले. मागील १५ वर्षापासून ही ग्रामपंचायत भाजपा च्या ताब्यात राहलेली आहे. सर्वात मोठा पक्ष म्हणून वंचित ने येथे सरपंच पदावर दावा केलेला आहे.

उमरेड तालुका मधे राजू मेश्राम यांच्या नेतृत्वात पक्षाने विरली गट ग्रामपंचायत मधे ९ पैकी ५ व किण्हाळा ग्रामपंचायत मधे ७ पैकी ६ सदस्य निवडून आनत पुर्ण बहुमताने एकहाती सत्ता संपादित केली आहे.

त्याशिवाय पक्षाचे कुही तालुक्यात ग्रामपंचायत कटारा (३), भारेगाव(१), विरखडी(१), भामेवाडा (१), डोंगरगाव (१), टाकळी (२), खरबी (१). रामटेक तालुक्यात देवलापार (२), दाऊद घोटी (२), पंजाळा (१). सावनेर तालुक्यात चनकापूर पिरा (१). नागपुर ग्रामीण तालुक्यात दवलामेटी (७), निप्पानी सोनेगाव (२). पांजरी परसोडी (३). उमरेड तालुक्यात विरली (५), किण्हाळा (६), मटकाझरी (२) अशे एकुण ४१ ग्रामपंचायत सदस्य निवडून आलेत.

नागपुर जिल्ह्यामध्ये एकुण १२७ ग्रामपंचायत च्या निवडनुका झाल्यात. त्यापैकी वंचित बहुजन आघाडी ने ३७ ग्रामपंचायत मधे एकुण १०२ उमेदवार उभे केले, त्यापैकी ४१ उमेदवार विजयी झालेत. २ ग्रामपंचायत मधे पुर्ण बहुमत व १ ग्रामपंचायत मधे सर्वात मोठा पक्ष म्हणून वंचित चा सरपंच असेल. व याद्वारे वंचित बहुजन आघाडी ने नागपुर ग्रामीण भागात आपले पाय घट्ट रोवन्यास शुरूवात केल्याचे दिसत आहे

पीआयएल इटॅलिका लाईफस्टाईल लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : कोडियात रोड, गाव सिसरमा, उदयपूर (राजस्थान) ३१३०३१ फोन : ०२९४-२४३२२७१/७२
ई-मेल : info@italica.com वेबसाईट : www.italica.com सीआयएनः एल२५२०७आरजे१९९२पीएलसी००६५७६

३१ डिसेंबर, २०२० रोजी संपलेली तिमाही आणि नऊ महिन्यांकरिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाचा उतारा

(रु. लाखांत)

अ. क्र.	तपशिल	संपलेली तिमाही		संपलेले नऊ महिने		संपलेले वर्ष
		३१-१२-२०२०	३१-१२-२०१९	३१-१२-२०२०	३१-१२-२०१९	३१-०३-२०२०
		अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	लेखापरिक्षित
१.	प्रवर्तनातून एकूण उत्पन्न (निव्वळ)	१८७४.१७	१२५४.२०	३८४०.१८	३७५५.११	४८७८.८३
२.	कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (कर अपवादात्मक आणि/किंवा अनन्य साधारण बाबींपूर्वी)	२०२.७१	६५.८५	२५५.०९	२२५.०१	४३२.८२
३.	करपूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा अनन्य साधारण बाबी पश्चात)	२०२.७१	६५.८५	२५५.०९	२२५.०१	४३२.८२
४.	करपश्चात निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा अनन्य साधारण बाबी पश्चात)	२०२.७१	६५.८५	२५५.०९	२२५.०१	७९.९१
५.	कालावधीकरिता एकूण सर्व समावेशक उत्पन्न (कालावधीकरिता नफा/(तोटा) (करपश्चात) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करपश्चात) समाविष्ट)	२०२.७१	६५.८५	२५५.०९	२२५.०१	७९.९१
६.	समभाग भांडवल	२३५०.००	२३५०.००	२३५०.००	२३५०.००	२३५०.००
७.	राखीव (पुनमुर्ल्याकीत राखीव वगळून) मागील वर्षाच्या लेखापरिक्षित ताळेबंदात दर्शविल्यानुसार	-	-	-	-	-
८.	प्रती भाग प्राप्ती (प्रत्येकी रु. १/- च्या) (खंडित आणि अखंडित परिचालनाकरिता) -मूलभूत आणि सौम्यिकृत	०.०९	०.०३	०.११	०.१०	०.०३

टिप :

१. ३१ डिसेंबर, २०२० रोजी संपलेली तिमाही आणि नऊ महिन्यांकरिता वरील वित्तीय निष्कर्ष हे २३.०१.२०२१ रोजी झालेल्या त्यांच्या सभेत लेखापरिक्षण समितीद्वारे पुनर्विलोकीत करण्यात आले आणि संचालक मंडळाद्वारे मंजुर आणि अभिलिखित करण्यात आले. सांविधिक लेखापरिक्षकांनी सेबी (एलओडिआर) रेग्युलेशन २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत आवश्यक असल्यानुसार ३१ डिसेंबर, २०२० रोजी संपलेली तिमाही आणि नऊ महिन्यांकरिता वित्तीय निष्कर्षाचे मर्यादित पुनर्विलोकन केले आहे.
२. सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एस्चेंजेसकडे दाखल केलेल्या तिमाही निष्कर्षांच्या तपशिलवार विवरणाचा वरील एक उतारा आहे. तिमाही निष्कर्षाचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्स्चेंजेसची वेबसाईट (www.bseindia.com आणि www.nseindia.com) वर आणि कंपनीची वेबसाईट म्हणजेच www.italica.com वर उपलब्ध आहे.

पीआयएल इटॅलिका लाईफस्टाईल लिमिटेडकरिता
दाऊद अली
मॅनेजिंग डायरेक्टर (डीआयएनः००१८५३३६)

ठिकाण : उदयपूर
दिनांक : २३.०१.२०२१

काळाच्या पडद्याआड जाऊ पाहणारी अविट गोडीची मेहरूणची बोरं

जळगाव विशेष
विजय पाठक

पूर्वी पासून जळगाव जिल्हा हा केळी ,कपाशी आणि कवींसाठी प्रसिध्द . खवैय्यांच्या नजरेतून पाहिले तर केळी भरीताची वांगी आणि मेहरूणच्या बोरांसाठी जळगाव प्रसिध्द. हिवाळयात जळगावकर बाहेरगावी जातांना न चुकता आपल्या नातेवाईकांसाठी भरीताची वांगी आणि मेहरूणची बोर हमखास नेतो. बसस्टँडवर अथवा रेल्वे स्टेशनवर देखील ही मेहरूणची बोर विकायला आलेली हिवाळयात दिसतील. त्यामुळे जळगावची एक वेगळी ओळख ही या मेहरूणच्या बोरांमुळे झालेली आहे.

बोर म्हटली की गोड आंबट तुरट अशा विविध चवीची आपल्याला गावोगाव पाहायला मिळतात. शेताच्या बांधावर उगवलेली बोरांचे झाडे अनेक ठिकाणी आपल्याला पाहायला मिळतात. गावोगाव बोर विकत मिळतात अथवा शेताच्या बांधावर उपलब्ध होतात. तरी देखील या मेहरूणच्या बोरांची गोष्टच न्यारी . पूर्वी जळगाव शहरापासून तीन कि.मी अंतरावर मेहरूण हे लहानसे गाव होते.शेजारी विस्तीर्ण तलाव,या परिसरात मोठया प्रमाणावर बोरांची झाडे होती . तीच ही मेहरूणची अविट गोडीची ,चवीची बोरं. किंचित लांबट ,गोड ,कीड नसलेली अशी ही बोर शतकानुशतकेआपले वेगळपण टिकवून आहेत.शबरीने रामाला जी गोड उष्टी बोर खायला दिली ती हीच बोरं असेही सांगितले जाते.या बोरांची चव ,गोडी काही औरच आहे. गेल्या पन्नास वर्षात जळगाव शहर बरेच विस्तारले आहे, मेहरूण आता जळगाव शहरात सामील होत हा सगळा परिसर विस्तीर्ण असा सिमेंटच्या जंगलाचा भाग झाला आहे . मेहरूण लगतची शेती जाऊन बंगले झालेत .याचा फटका बोरांच्या झाडांना बसला आहे.ही बोरांची झाडे लुप्त झालीत.असे असले तरी जळगाव तालुक्यात आव्हाणे वावडदा ,खेडी ,वडनगरी सारख्या काही गावात या बोरांची झाडे अदयाप टिकून आहेत. शेतक-यांनी जाणीवपूर्वक ती टिकवून ठेवलीत.

शेताच्या बांधावर ही झाडे वर्षानुवर्षे जुनी असल्याचे सांगण्यात येते. या जपलेल्या बोरांच्या झाडांचा शेतक-यांना आर्थिक आधार होत असतांना दिसतो.

डिसेंबर जानेवारी हा या बोरांचा सिझन. दूरवर नेईपर्यत ही चांगल्या स्थितीत रहात असल्याने जळगावकर आपल्या नातेवाईकांना भेटायला जातांना ही बोरं नेतात.

बाजारात ही बोर नेण्यासाठी या विक्रतेंजवळ करंडे देखील उपलब्ध असतात . या करंडयांमध्ये ही बोर नेली जातात.

आता बोरांच्या अनेक नवनवीन जाती आल्याचे पाहायला मिळते पण या मेहरूणच्या बोरांची नैसर्गिक गुणधर्माची सर त्याला नाही.त्यामुळे या जातीच्या वाणाची संवर्धनाची नितांत गरज आहे अन्यथा काळाच्या ओघात ही जात नष्ट होईल ,हे लक्षात घेऊन या मेहरूणच्या बोरांचे हे वेगळेपण टिकून राहण्यासाठी जळगावच्या कृषी विभागाने प्रयत्न सुरू केलेत.

भरताची वांगी ही केवळ बामणोद परिसरात चांगल्या प्रकारे येतात. तेथील भौगोलिक वेगळेपण, जमीन हवामान आणि पाणी यामुळे ही वांगी चवीला वेगळी जाणवतात .

हे लक्षात घेऊन त्यांना प्रयत्नपूर्वकतसे भौगोलिक मानांकन दिले गेले आहे. त्याच प्रमाणे मेहरूणची बोरे यांचे देखील एक वेगळेपण आहे हे लक्षात घेऊन त्यास भौगोलिक मानांकन मिळावे यासाठी कृषी विभागाचे प्रयत्न सुरू झाले आहेत. काळाच्या पडदयाआड जाऊ पाहणारी ही अवीट गोडीची मेहरूणची बोरं वाचवली पाहिजेत.